


पथनाट्याचे सादरीकरण करताना कलाकार.

# पोलिस सेवांबद्दल पथनाट्यातून जनजागृती

**पुणे :** शहर पोलिसांकडून नागरिकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देण्यासाठी आता पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे. एकंदर भरोसा सेल, सेवा ॲप, बडीकॉप, दामिनी पथक, पोलिस काका यांसारख्या सेवांना नागरिकांचा मिळणारा प्रतिसाद पाहता हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. नुकतेच या उपक्रामाचे उद्घाटन पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांच्या हस्ते झाले. या वेळी अनेक मान्यवर उपस्थित होते. पंख संस्था व क्विकहील फाउंडेशन पुणे पोलिसांच्या सहकार्याने हा उपक्रम राबवित आहे. आगामी कालावधीत प्रत्येक पोलिस ठाण्याच्या हद्दीत पथनाट्याचे सादरीकरण केले जाणार आहे. त्यामुळे जास्तीत-जास्त नागरिकांनी पथनाट्याचे सादरीकरण पाहावे, असे आवाहन पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.